श्री नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ.केंद्र कोहणे, ता. अकोले हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र. साप्रवि-१/आस्था-४/२४६/४५५/२०२६
अहिल्यानगर दिनांक — स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा :- १. कार्यालयीन दोषारोपपत्र आदेश क्र साप्रवि-१/आस्था-४/३७/२०२५, दि. २२/०१/२०२५

२. वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेकडील पत्र क्र. २१/२०२५ दि. २३/०१/२०२५

३. श्री. धुमाळ, परिचर यांचेकडील दि. ३१/०१/२०२५ रोजीचा लेखी खुलासा

४. कार्यालयीन आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/६३/२०२५ दि. ११/०२/२०२५

५. मा.सहाय्यक आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेडील चौकशी अहवाल क्र.विशा-४/खाचौ/सी.आर.२८/२०२५ दि. १३/०४/२०२६ (प्राप्त दि. २५/०५/२०२६)

६. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस क्र. साप्रवि-१/आस्था-४/२४६/४०१/ /२०२६, दिनांक ११/०७/२०२६

७. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेकडील पत्र क्र. वशि/आरोग्य/आस्था/८००/२०२६, दिनांक २४/०७/२०२६

८. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) मधील नियम १९६४ मध्ये ४ (७)

श्री नितीन शहाजी धुमाळ, परिचर हे प्राथमिक आरोग्य केंद्र कोहणे, ता. अकोले येथे कार्यरत असताना दिनांक २१/०५/२०२३ ते दिनांक ३१/०८/२०२३ अखेर एकुण १३५ दिवस व दिनांक २७/१०/२०२३ ते आज अखेर (दिनांक ०३/०१/२०२५) एकुण ४३४ दिवस अनाधिकृत गैरहजर राहिल्याने संदर्भ क्र. ०१ अन्वये दोषारोपपत्र बजावण्यात येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आले होते. संदर्भ क्र.०३ अन्वये श्री धुमाळ यांनी दोषारोप अमान्य केलेले आहेत. प्रकरणी संदर्भ क्र. ०४ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली होती त्यानुसार संदर्भ क्र. ०५ अन्वये चौकशी अहवालानुसार श्री धुमाळ, परिचर यांचेवर ठेवण्यात आलेले दोन्ही आरोप सिध्द होत असल्याने संदर्भ क्र. ०६ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (७) नुसार सेवेतून बडतर्फ करणे ही शिक्षा का करणेत येवू नये? याबाबत खुलासा सादर करणेकरिता कळविण्यात आलेले आहे.

श्री नितीन शहाजी धुमाळ, परिचर यांनी संदर्भ क्र. ०७ अन्वये सादर केलेला लेखी खुलासा हा समाधानकारक नसलेने खुलासा अमान्य करण्यात येत आहे. करिता संदर्भ क्र. ०६ अन्वयेचे अंतिम कारणे दाखवा नोटिसीत नमूद केलेली शिक्षा कायम करण्याची या प्राधिकरणाची धारणा निश्चित झाल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (७) नुसार, **सेवेतून बडतर्फ करणे** ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ.केंद्र कोहणे, ता. अकोले यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक ----20261104040207------ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:34:22

आनंद भंडारी, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ.केंद्र कोहणे, ता. अकोले

व्दारा व प्रत - वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र कोहणे, ता. अकोले

२-/नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ.केंद्र कोहणे, ता. अकोले

यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत - १. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

२. निवड नस्ती